क्र.का.३/डाटा एंट्री/बारकोड/१३/४२८
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे.
दिनांक - ०९ /१२/२०१३.

**विषय:-** दस्त नोंदणीनंतर पक्षकारांना मूळ दस्त, थंबनेल प्रिंट, सीडी व सूची क्र.२ ची प्रत देणेबाबत.

**परिपत्रक :**

**प्रस्तावना :**

नोंदणी व मुद्रांक विभागाने सन २००२ पासून दस्त नोंदणी प्रक्रियेसाठी संगणकीकृत नोंदणी प्रणालीचा वापर सुरु केला आहे. दस्त नोंदणीस दाखल झाल्यापासून ३० मिनिटांचे आत पक्षकारास मूळ दस्त परत मिळणे तसेच त्यासोबत दस्तऐवजाची सूची क्र.२ ची प्रत विनामूल्य मिळणे ही या प्रणालीची ठळक वैशिष्टये होती. त्या सुधारणांच्या मालिकेतील पुढील पाऊल म्हणून जुलै २०१२ पासून आय-सरिता ही अद्ययावत प्रणाली वापरात आणण्यात आली असून, वर नमूद केलेल्या वैशिष्टयांशिवाय पक्षकारांना थंबनेल प्रिंट व सीडी देखील विनामूल्य मिळणे या वैशिष्टयांचा अंतर्भाव या प्रणालीमध्ये करण्यात आला आहे.

या प्रणालीचा राज्यात यशस्वी अंमल चालू असून नागरिकांनी व इतर संबंधित घटकांनी या वैशिष्टयांचे स्वागत केले आहे. तरीदेखील राज्यातील काही दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये काही वेळा दस्त नोंदणीनंतर, दस्त लगोलग स्कॅनिंग होत नाही व त्यामुळे संबंधितांना विलंबाने परत मिळतो. यामध्ये त्वरित सुधारणा होणे आवश्यक आहे.

पक्षकारांना त्यांचा मूळ दस्त नोंदणी होऊन ३० मिनिटात परत मिळण्याच्या दृष्टीने, नोंदणी प्रक्रियेतील कामकाजातील दुय्यम निबंधक व त्यांचे कर्मचा-यांची कामे आणि खाजगी संस्थेच्या ऑपरेटर्सची कामे निश्चित करुन त्यासाठीची कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. दस्त नोंदणी पूर्ण केल्यानंतर गोषवारा-२ वर दुय्यम निबंधकांनी सहया करुन संबंधित कार्यालयीन कर्मचा-याने दस्तऐवजावर पेजींग केल्यानंतर तो दस्त लगोलग स्कॅनिंग ऑपरेटरकडे देणे ही दुय्यम निबंधकांची/त्यांच्या कर्मचा-याची जबाबदारी आहे. तर याप्रमाणे दस्त मिळाल्यानंतर तो लगोलग स्कॅन करणे ही स्कॅनिंग ऑपरेटरची जबाबदारी आहे.

दस्त नोंदणीनंतर उशिराने स्कॅनिंग होण्याच्या प्रकारांचा आढावा घेतांना, खाजगी संस्थांकडून असेही कारण सांगितले जाते की, दस्त स्कॅनिंगसाठी वेळेवर प्राप्त होत नाहीत किंवा विलंबाने प्राप्त होतात. दस्त स्कॅनिंगसाठी ऑपरेटरकडे कधी हस्तांतरित केला याची संगणकप्रणालीमध्ये नोंद नसल्यामुळे उपरोक्त नमूद कारणाची शहानिशा करणे शक्य होत नव्हते. यावर उपाययोजना म्हणून आय-सरिता प्रणालीमध्ये, दस्त स्कॅनिंगसाठी देतांना, गोषवारा-२ वरील बारकोड वाचण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्याचे सविस्तर प्रात्यक्षिक माहे नोव्हेंबर २०१३ मध्ये पुणे येथे झालेल्या प्रशिक्षण सत्रामध्ये सर्व दुय्यम निबंधकांना दाखविण्यात आले आहे.

**तरी सर्व दुय्यम निबंधकांना सूचित करण्यात येते की,**

१.१) गोषवारा-२ मुद्रित केल्यानंतर, विनाविलंब पक्षकार व ओळखदारांच्या सहया त्यावर घ्याव्यात, दस्त नोंदणीच्या शे-यामध्ये सहीची कार्यवाही पूर्ण करावी आणि आय-सरिता प्रणालीतील शिक्का क्र.५ लगोलग उमटवावा.

१.२) त्यानंतर उक्त दस्त पेजींग करणा-या कर्मचा-याकडे विनाविलंब हस्तांतरित करावा, त्या कर्मचा-याने पेजींगची कार्यवाही विनाविलंब पूर्ण करावी.

१.३) त्यानंतर उक्त दस्त स्कॅनिंग ऑपरेटरकडे लगोलग हस्तांतरित करावा. उक्त हस्तांतरणाचे वेळी वर नमूद केल्याप्रमाणे बारकोड सुविधेचा वापर करावा.

१.४) या सुविधेमुळे दस्त स्कॅनिंगसाठी हस्तांतरणाची वेळ नमूद होणार आहे, त्यामुळे दुय्यम निबंधकांनी व त्यांच्या कर्मचा-यांनी त्यांचेवरील उपरोक्त नमूद सर्व जबाबदा-या विनाविलंब पूर्ण करण्याची दक्षता घ्यावी. अनावश्यक विलंब वारंवार दिसून आल्यास संबंधित दुय्यम निबंधक व त्यांचे कर्मचारी यांना जबाबदार धरुन प्रशासकीय कारवाई करणे भाग पडेल याची नोंद घ्यावी.

१.५) त्याचबरोबर स्कॅनिंग ऑपरेटर्स दस्ताचे स्कॅनिंग विनाविलंब करतील याची सर्वांनी दक्षता घ्यावी.

(सही/- एस.चोक्कलिंगम् )
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य,पुणे.**

**प्रति,**

**१) सर्व दुय्यम निबंधक (संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षक यांचेमार्फत)**
**२) संबंधित खाजगी संस्था.**

**प्रत :**

१) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक.
२/-सर्व सह जिल्हा निबंधक (संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षक यांचेमार्फत).
२) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.

**निर्गमित**

नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
(संगणक) महाराष्ट्र राज्य, पुणे.